3 AUG 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊ साठे जागतिक दर्जाचे साहित्यिक

## डॉ. बाबूराव गुरव; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर, ता. २ : लोकशाहीर आण्णा भाऊ साठे हे देशाचे स्वातंत्र्य, पुरुषांचा स्वाभिमान आणि स्त्रीचे चारित्र्य जपणारे जागतिक दर्जाचे महान साहित्यिक होते', असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबूराव गुरव यांनी मंगळवारी केले.

अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे विद्यापीठातील वि.स. खांडेकर भाषा भवनात 'अण्णा भाऊ साठे: वाङ्मय आणि विचारविश्व' या विषयावरील व्याख्यान झाले. त्यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. गुरव म्हणाले, 'आण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी स्वरुपाचे होते. त्यांची लेखक म्हणून नोंद घेणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ आहे. विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रयत्नातून आण्णांची 'फकिरा' ही कादंबरी विद्यापीठाच्या ग्रंथालयात ठेवली आहे. कालांतराने प्रतिष्ठित लेखकांनी आण्णांच्या साहित्याकडे लक्ष दिले.'



**कोल्हापूर : अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ साहित्यिक बाबूराव गुरव. शेजारी डावीकडून डॉ. उत्तम सकट, नंदकुमार मोरे, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, रणधीर शिंदे.**

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, 'कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नसताना, कोणत्याही प्रकारचे औपचारिक शिक्षण नसताना शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षेत्रामधील लोकशाहीर अण्णा भाऊ साठेंसारखी एखादी व्यक्ती उच्च प्रतीचे साहित्य निर्माण करू शकते, हे खूप आदर्शवत आहे. धावणे, कुस्ती, वाचन, लिखाण, गाणे यामध्ये ते पारंगत होते. लोकशाहीर अण्णांचे साहित्य जगभर पोहोचलेले आहे, त्यांच्या साहित्याचे वाचन विद्यार्थ्यांनी केले पाहिजे.'

'अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ आणि मातंग समाज' या पुस्तकाचे लेखक व उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट, छत्रपती शाहू क्रीडा पुरस्कारप्राप्त दीपक पाटील, सेट परीक्षा उत्तीर्ण भक्ती नाईक, शीतल पटले, नेट परीक्षा उत्तीर्ण अमोल देशमुख यांचा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

क्रांतीसिंह

# क्रीडापटूंनी मानसिक तंदुरुस्त राहणे महत्वाचे

कोल्हापूर(प्रतिनिधी):- क्रीडापटूंनी शारीरिक तंदुरुस्ती बरोबरच मानसिक तंदुरुस्ती कडेही जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. खेळत असताना उद्भवणाऱ्या ताणतणावांचा सामना जितक्या सहजतेने करता येईल, तितका खेळ




उंचावणे शक्य होईल. त्या दृष्टीने त्यांच्या प्रशिक्षकांनी त्यांच्या मानसिकतेवर काम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील टेक्सास येथील मिड वेस्टर्न स्टेट विद्यापीठाचे प्राध्यापक व क्रीडातज्ज्ञ डॉ. फ्रँक बी. व्हेट यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आणि मीड वेस्टर्न स्टेट युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने सायंकाळी ६ ते १० या कालावधीत कॉम्पिटिटीव्ह स्पोर्ट्स अँड ग्लोबल ऑपॉर्च्युनिटीज् या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबविनारमध्ये डॉ. व्हेट हे फिजिऑलॉजिकल थ्रेशोल्ड इन् ट्रेनिंग दि कॉम्पिटिटीव्ह स्पोर्ट्स या विषयावर बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या वेबिनारमध्ये अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. फ्रँक व्हेट म्हणाले, भारतीय क्रीडापटू आणि प्रशिक्षक व मार्गदर्शक हे क्रीडापटूंच्या शारीरिक तंदुरुस्तीवर काम मोठ्या प्रमाणावर करतात. पण, त्यांचा भर हा केवळ स्नायूंच्या पिळदारपणावर आणि सक्षमतेकडे अधिक असतो. तसे करणे योग्यच आहे. मात्र, त्याच्या बरोबरीने शरीरातील विविध संस्था, जसे की, रक्ताभिसरण, श्वासोच्छवास आदींच्या क्षमतावर्धनाकडेही अधिकाधिक लक्ष देणे आवश्यक आहे. त्यामुळे शारीरिक स्वास्थ्य व तंदुरुस्ती दीर्घकाळ टिकविणे शक्य होते. डॉ. व्हेट यांनी खेळाडूंना प्रशिक्षण कसे द्यावे व त्या प्रशिक्षणाचे त्यांच्या शरीरावर काय परिणाम होतात, या विषयी उपस्थित क्रीडा प्रशिक्षकांना व खेळाडूंना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. सेथ स्केल्टन यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रीडा शिक्षण कशा पद्धतीने घेता येते, खेळाडूंना आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी काय करावे, याचे मार्गदर्शन केले. पल्लवी देसाई यांनी विविध विद्यापीठांमध्ये पदवी व पदव्युत्तर क्रीडा व शारीरिक शिक्षण कसे प्राप्त करता येते, त्यासाठी लागणारी कागदपत्रे आणि तांत्रिक बाबींविषयी मार्गदर्शन केले.

या वेबिनारचे आयोजन शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाद्वारे करण्यात आले. डॉ. शरद बनसोडे यांनी वेबिनारचे संचालन केले. यशस्वी आयोजनासाठी अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक गौरेश पवार, अक्षय कारेकर, डॉ. रोहित पाटील, पृथ्वीराज सरनाईक, सुचय खोपडे यांनी परिश्रम घेतले.

पुढारी

# मानवतावादी दृष्टीचे लेखक अण्णा भाऊ साठे : कांडर

कोल्हापूर : अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय जात, वर्ग, भेदभाव ओलांडून माणसांच्या प्रश्नांची, माणुसकीची जाणीव जागी ठेवणारे होते, असे प्रतिपादन लेखक अजय कांडर यांनी केले. 'अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय : पुनर्शोधाच्या वाटा' या परिसंवादात ते बोलत होते.

अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनातील जातवास्तव संबंधी प्रा. सोमनाथ कदम यांनी भारूड सादर केले. प्रा. सुनीता बोर्डे यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनातील स्त्रीजीवनाचे चित्रणाच्या व्याप्तीचे वेगळेपण व महत्व विशद केले. प्रा. निरंजन फरांदे यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्मयीन लेखन कार्यामागील वर्ग जाणिवांची विचार परंपरा स्पष्ट केली. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले तर परिचय राजेश पाटील यांनी केला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी

लोकमत

# पदवी, पदव्युत्तरच्या परीक्षा पुन्हा सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू असून, मंगळवारी बी. फार्मसी, एमबीए, एमसीए या तीन अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी ३८० विद्यार्थी उपस्थित होते. तसेच एम.ए. अर्थशास्त्र सेमिस्टर दोन, बी.टेक. सेमिस्टर दोन, एम.एस्सी. केमिस्ट्री सेमिस्टर एक सह सात अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले.

## दहावीच्या 'त्या' पुरवणी परीक्षा सुरू

जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आल्यामुळे २० व २८ जुलैला होणाऱ्या दहावीच्या माध्यमिक प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा स्थगित केल्या होत्या. यातील २० जुलैला स्थगित करण्यात आलेल्या सर्व विषयांच्या परीक्षा बुधवारी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत झाल्या, तर २८ जुलैला स्थगित केलेला सामाजिक शास्त्र पेपर नंबर एक, इतिहास व राज्यशास्त्र या विषयांच्या परीक्षा आज, गुरुवारी होणार असल्याची विभागीय सचिव डी.एस. पोवार यांनी दिली.

सकाळ

# विद्यापीठात शनिवारी 'कॅमेरा हँडलिंग' कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशनतर्फे शनिवारी (ता. ५) कॅमेरा हॅन्डलिंग या विषयावर कार्यशाळा होणार आहे. डेहराडून येथील फोटोग्राफी इन्स्टिट्यूटमधील कॉन्ट्रीब्यूटरी टीचर विराज चव्हाण विद्यार्थ्यांना कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देणार आहेत. दुपारी दोन वाजता हे प्रात्यक्षिक सुरू होईल. सर्वांसाठी हे प्रशिक्षण खुले असून विद्यार्थ्यांसोबतच फोटोग्राफीची आवड असणाऱ्यांनी यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

तरुण भारत

# गोविंद पाटील यांच्या बालकवितासंग्रहाचा विद्यापीठ अभ्यासक्रमात समावेश

कूर : कोनवडे (ता.भुदरगड) येथील कवी आणि प्रयोगशील शिक्षक गोविंद पाटील यांच्या 'थुई थुई आभाळ' या बालकवितासंग्रहाचा शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवी (एम.ए.) अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अभ्यासमंडळाकडून एम.ए.भाग एकच्या वर्गासाठी नुकताच सुधारित अभ्यासक्रम गठीत करण्यात आला आहे. त्या अंतर्गत प्रथम सत्रासाठी तयार करण्यात आलेल्या 'बालसाहित्य' या विशेष अभ्यासपत्रिकेमध्ये क्रमिक पुस्तक म्हणून या बालकवितासंग्रहाचा समावेश करण्यात आला आहे. सांगलीच्या सृजन प्रकाशनाने हा कवितासंग्रह प्रकाशित केला आहे. अल्पावधीतच या संग्रहाच्या दोन आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. कवी गोविंद पाटील यांचे यापूर्वी 'गावकिर्तन', 'धूळधाण', आणि 'उध्वस्त ऋतुंच्या कविता' हे तीन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. कवितालेखनासाठी त्यांना महाराष्ट्रातील राज्यस्तरावरचे प्रतिष्ठेचे पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार, यशवंतराव चव्हाण वा?मय पुरस्कार मिळाले आहेत. विद्यार्थप्रिय शिक्षक म्हणून परिचित असलेल्या श्री. पाटील यांनी लहान मुलांमधील सर्जनशील वृत्ती वाढीस लागावी म्हणून प्राथमिक स्तरावर लेखन कार्यशाळा, विद्यार्थी साहित्य संमेलने इत्यादी विविध वाङ्मयीन उपक्रम राबविले आहेत. पुरोगामी शिक्षक समितीचे सक्रिय कार्यकर्ते असलेले श्री.पाटील सध्या रायगड जिल्ह्यातील पनवेल येथे प्राथमिक शिक्षक म्हणून काम पाहात आहेत.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिनी सायकल रॅली

कोल्हापूर : स्वातंत्र्य दिनी १५ ऑगस्ट रोजी ८.३० वाजता डिपोर्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या वतीने सायकल रॅलीला सुरूवात होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपासून सायकल रॅलीला सुरूवात होईल. रसायनशास्त्र अधिविभाग, भाषा भवन, परीक्षा विभाग, मुलांचे वसतिगृह, क्रीडा विभाग, क्रिकेट पॅव्हेलियन, दूरशिक्षण विभाग, गेस्ट हाऊस, मुलींचे वसतिगृहमार्गे पुन्हा मुख्य इमारतीसमोर सायकल रॅलीची सांगता होईल. या रॅलीचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. एन. सपले, डॉ. एम. एस. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी जास्तीत जास्त प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.